वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™



पान 3 वरुन...

शाळेची परवानगी रखडली; प्रशासन धारेवर

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 18 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 'ऑपरेशन टायगर' बाबत धक्कादायक घडामोडी

# शिवसेनेतील बंडखोर खासदार अज्ञातस्थळी!



**महाईन्यूज । मुंबई**

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील काही खासदारांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ठाकरे गटातील सहा खासदारांना सुरक्षेच्या कारणास्तव दिल्लीतून उत्तर भारतातील एका अज्ञात ठिकाणी हलविण्यात आल्याची चर्चा आहे. १९ जून रोजी होणाऱ्या शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर या घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.**

२०२२ मध्ये झालेल्या आमदारांच्या बंडावेळी सर्वांना आसाममधील गुवाहाटी येथे नेण्यात आले होते. यावेळी मात्र खासदारांना वेगळ्या राज्यातील सुरक्षित स्थळी हलविण्यात आल्याची माहिती समोर येत असून, त्या ठिकाणाबाबत कमालीची गोपनीयता राखण्यात आली आहे. संबंधित खासदार १९ जून रोजी थेट मुंबईत दाखल होणार असल्याचेही बोलले जात आहे.

दरम्यान, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर हे इतर खासदारांसोबत नसून सध्या पुण्यात असल्याने त्यांच्या भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत ठाकरे गटातील नऊपैकी सहा खासदार प्रवेश करणार असल्याच्या चर्चांमुळे 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा अधिक रंगली आहे.

मात्र, या सर्व घडामोडींमध्ये ठाकरे गटातील काही खासदारांनी पक्षनिष्ठा कायम असल्याचे स्पष्ट केले आहे. नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे आणि ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी आपण कोणत्याही परिस्थितीत पक्ष सोडणार नसल्याचे सांगितले आहे. तसेच ज्येष्ठ नेते अनिल देसाई आणि दक्षिण मुंबईचे खासदार अरविंद सावंत हे देखील उद्धव ठाकरे यांच्यासोबतच ठाम राहणार असल्याचे मानले जात आहे.

राजाभाऊ वाजे यांनी प्रतिक्रिया देताना, "मी उद्धव ठाकरे यांच्यासोबतच आहे आणि कायम राहणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मला कोणताही संपर्क झालेला नाही. मी केवळ शासकीय समितीच्या बैठकीसाठी दिल्लीत आलो आहे," असे स्पष्ट केले.

खासदार संजय दिना पाटील यांनीही पक्षांतराच्या चर्चांना फेटाळून लावत, "मी कोणत्याही दुसऱ्या पक्षात जाणार नाही. लवकरच सर्व अफवांवर पडदा पडेल," असे सांगितले. या पार्श्वभूमीवर १९ जून रोजी शिवसेनेच्या वर्धापन दिनी नेमक्या कोणत्या राजकीय घडामोडी घडतात, याकडे राज्यासह देशाच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



ओमराजे निंबाळकर



नागेश पाटील आष्टीकर



भाऊसाहेब वाकचौरे



संजय दिना पाटील



संजय जाधव



संजय देशमुख

### १९ जूनकडे राज्याचे लक्ष

शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना अभूतपूर्व वेग आला आहे. ठाकरे गटातील काही खासदार शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चांमुळे 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा रंगली आहे. दरम्यान, काही खासदारांनी पक्षनिष्ठा कायम असल्याचे जाहीर केल्याने संभ्रम अधिक वाढला आहे. संभाव्य पक्षप्रवेश, बदलणारी राजकीय समीकरणे आणि नेत्यांच्या पुढील भूमिकांमुळे १९ जून हा महाराष्ट्राच्या राजकारणासाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अधिकृत घोषणा आणि प्रत्यक्ष घडामोडींनंतरच या चर्चांचे वास्तव स्पष्ट होणार आहे.

### 'ऑपरेशन टायगर'ची राजकीय चर्चा

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील काही खासदारांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सहा खासदारांना सुरक्षेच्या कारणास्तव दिल्लीतून उत्तर भारतातील एका अज्ञात ठिकाणी हलविण्यात आल्याची चर्चा आहे. १९ जून रोजी होणाऱ्या शिवसेनेच्या वर्धापन दिनी या घडामोडींना अंतिम स्वरूप मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, राजाभाऊ वाजे, संजय दिना पाटील, अनिल देसाई आणि अरविंद सावंत यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहणार असल्याची भूमिका स्पष्ट केल्याने राजकीय समीकरणे अधिकच रंगली आहेत. मात्र, पक्षांतराबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसून, १९ जूननंतरच या चर्चांचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

# शर्तभंग; २०० कोटींचे भूखंड सरकारजमा

## तपासलेल्या २२० प्रकरणांपैकी ३४ प्रकरणांत कारवाई; पुणे शहरातील १३ भूखंड सरकारच्या ताब्यात

**महाईन्यूज । पुणे**

**कब्जेहक्काने किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या वर्ग ३४ शर्तभंग प्रकरणांमधील जमिनी जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेतल्या आहेत. यापैकी सर्वाधिक जमिनी पुणे शहरातील शर्तभंग झालेल्या आहेत. या जमिनींची किंमत ११४ कोटी रुपये असून, त्या सरकारजमा झाल्या आहेत.**




मुंढवा आणि ताथवडे येथील सरकारी जमिनीच्या खरेदी करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर राज्य सरकारने नियुक्त केलेल्या खारगे समितीने सरकारला अहवाल दिला होता. त्या अहवालात सरकारी जमिनींची मालकी अबाधित राहण्याबाबत लक्ष वेधले आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने सरकारी जमिनींचे मूल्यांकन, त्यांची सात बारा किंवा मालमत्ता पत्रकावर असलेल्या नोंदींची खात्री करण्याचे आदेश दिले. सरकारी जमिनींवर लक्ष ठेवण्याच्या ही सूचना दिल्या होत्या. सरकारी जमिनींचा वापर योग्य त्या कामांसाठी होतो की नाही याची शहानिशा करण्याची सूचना करण्यात आली.

त्यानुसार जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पुणे शहरासह जिल्ह्यातील तहसीलदार, उपविभागीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीत कारवाई करण्याच्या सूचनाही दिल्या. पुणे, पिंपरी चिंचवड शहरासह जिल्ह्यातील २१०० प्रकरणांमध्ये सरकारी जमिनी भाडेतत्त्वावर देण्यात आल्या आहेत.

सरकारी जमिनींचा योग्य वापर झाला किंवा नाही या बाबतचा तहसीलदारांकडून अहवाल मागविण्यात आला होता. त्या अहवालाच्या आधारे शर्तभंग झालेल्या किंवा दंडात्मक कारवाई करण्याबाबतच्या प्रकरणांची निश्चिती करण्यात आली. काही प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करून त्या जमिनी नियमानुकूल करण्याची कारवाई जिल्हा प्रशासनाने केली. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये जमिनीची शर्तभंग झाल्याचा अहवाल तहसीलदारांनी दिला होता. त्यानुसार, त्या जमिनी शर्तभंग झाल्याने ताब्यात घेण्याची कारवाईही जिल्हा प्रशासनाने सुरू केली.

जिल्ह्यातील एकूण शर्तभंगाच्या तपासलेल्या २२० प्रकरणांपैकी ३४ प्रकरणांमध्ये शर्तभंग झाल्याने त्या ठिकाणच्या जमिनी ताब्यात घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये पुणे शहरातील सर्वाधिक १३ ठिकाणच्या जमिनी ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात आली. त्या पाठोपाठ शहराजवळील अपर तहसील लोणी काळभोर, अपर तहसील पिंपरी चिंचवड येथील प्रकरणांमध्ये जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

### खारगे समितीच्या अहवालानंतर वेगवान कारवाई

मुंढवा व ताथवडे येथील सरकारी जमिनींच्या व्यवहारानंतर नियुक्त करण्यात आलेल्या खारगे समितीच्या अहवालानुसार जिल्हा प्रशासनाने सरकारी जमिनींची विशेष तपासणी सुरू केली. तपासलेल्या २२० प्रकरणांपैकी ३४ प्रकरणांत शर्तभंग आढळल्याने संबंधित भूखंड सरकारजमा करण्यात आले, तर काही प्रकरणांमध्ये दंड आकारून जमिनी नियमानुकूल करण्यात आल्या.

# दुसऱ्या पत्नी, सावत्र मुलांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या; तिघांना अटक

**महाईन्यूज । पुणे**

**पहिल्या घटस्फोटानंतर दुसरे लग्न केलेली महिला आणि तिच्या दोन मुलांच्या मानसिक त्रासाला व जाचाला कंटाळून तरुणाने विष पिऊन जीवन संपविल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यांची फक्त पैशांवर नजर होती. ते जादुटोणा करुन त्यांना त्रास देत होते, असे फिर्यादीमध्ये नमूद करण्यात आले आहे.**



राजीव मनोहर पायगुडे (वय ५३, रा. शुक्रवार पेठ) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत त्यांचे भाऊ रवींद्र मनोहर पायगुडे (वय ५५, रा. बिबवेवाडी) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा कायद्याखाली गुन्हा दाखल करुन मनिषा ऊर्फ मंगल राजीव पायगुडे (वय ४०), स्मृती राजीव पायगुडे (वय २४) आणि रोहित राजीव पायगुडे (वय २२, सर्व रा. मांडवी, ता. हवेली) यांना अटक केली आहे. ही घटना शुक्रवार पेठ येथील घरात १५ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या पूर्वी घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजीव पायगुडे याचा कौटुंबिक कारणावरुन पहिला घटस्फोट झाला होता. त्यानंतर २०२० मध्ये राजीव याने मनिषा ऊर्फ मंगल हिच्यासोबत दुसरे लग्न केले. मनिषा हिला पहिल्या पतीपासून स्मृती व रोहित अशी दोन मुले आहेत. राजीव त्यांच्याबरोबर त्यांच्या हवेली तालुक्यातील मुळ गाव मांडवी येथे राहात होता. त्यांच्या वडिलोपार्जित शुक्रवार पेठेतील घरी तो राहत असे आणि रात्री मांडवी येथे जात असे. राजीव याचा २० एप्रिलला फिर्यादी रवींद्र पायगुडे यांना फोन आला.

त्याने सांगितले की, पत्नी मनिषा, मुलगी स्मृती व मुलगा रोहित यांनी कोयत्याने मारहाण केली आहे. ते खूप त्रास देतात. त्यांच्या त्रासाला कंटाळून मी जीवन संपवणार. मी दोन दिवसांमध्ये तुम्हाला दिसणार नाही. रवींद्र पायगुडे यांनी त्याला समजावल्यावर बिबवेवाडी येथे आई व बहिणीसोबत राहत होता. त्यानंतर १५ जून रोजी शुक्रवार पेठेतील घरी राजीव याने विष पिऊन स्वत:ला संपविले. त्यांनी मरणापूर्वी खडक पोलिसांच्या नावाने सुसाईड नोट लिहिली होती. त्यात त्याने म्हटले होते की, त्याची पत्नी मंगल, मुलगी स्मृती व मुलगा रोहित यांना फक्त पैसे पाहिजेत, माणुसकी नको. २० एप्रिल रोजी त्याला मारहाण केल्यानंतर तो मांडवी येथील घरी गेला नव्हता. त्यांना लहानाचे मोठे केले आहे, तरी त्यांनी त्या उपकाराची जाण ठेवली नाही.

त्यामुळे मला जगायचे नाही. मंगल हिने माझ्या आईवडिलांचे नाव खराब केले आहे. मनिषा ही जादुटोणा करीत आहे. त्यामुळे आता जगायचे नाही. मंगल, स्मृती, रोहित यांच्या मानसिक त्रासाला व जाचाला कंटाळून हे पाऊल उचलत असल्याचे सुसाईड नोटमध्ये म्हटले आहे.

### सुसाईड नोटमध्ये गंभीर आरोप

मृत राजीव पायगुडे यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये पत्नी मनिषा, सावत्र मुलगी स्मृती आणि सावत्र मुलगा रोहित यांच्याकडून सतत मानसिक छळ, पैशासाठी त्रास व मारहाण होत असल्याचा आरोप केला आहे. तसेच पत्नी जादूटोणा करत असल्याचाही उल्लेख करून या त्रासाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या सुसाईड नोटच्या आधारे पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

खडक पोलिसांनी तिघांना मांडवी येथील घरातून ताब्यात घेऊन अटक केली आहे. पोलीस उपनिरीक्षक जयसिंग दाढे तपास करीत आहेत.

# शाळेची परवानगी रखडली; प्रशासन धारेवर

## मोशीतील शाळा बांधकामाचा मुद्दा सभागृहात गाजला




## नगरसेविका अर्चना सस्ते यांचा प्रशासनाला थेट जाब

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील प्रस्तावित शाळा इमारतीच्या बांधकाम परवानगीचा प्रश्न महिनोनमहिने प्रलंबित ठेवल्याबद्दल नगरसेविका अर्चना राजेश सस्ते पाटील यांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत त्यांनी प्रशासनाला थेट जाब विचारत विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारी ही कार्यपद्धती असल्याचा गंभीर आरोप केला.**



मोशी बोऱ्हाडेवाडी येथील प्रभाग क्रमांक २ मधील शाळेसाठी आरक्षित जागेवर नियमानुसार शाळा स्थापन करण्यात आली आहे. मात्र शाळा इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली परवानगी मिळावी यासाठी अनेक महिन्यांपूर्वी सादर करण्यात आलेली फाईल अद्याप मंजूर करण्यात आलेली नाही. ही फाईल केवळ एका विभागातून दुसऱ्या विभागात फिरवली जात असून त्यावर कोणताही ठोस निर्णय घेतला जात नसल्याची तक्रार नगरसेविका अर्चना सस्ते यांनी सभागृहात केली.

या मुद्द्यावर सभागृहात तीव्र शब्दांत संताप व्यक्त करत त्यांनी डॉ. विजय सूर्यवंशी तसेच रवी लांडगे यांना थेट जाब विचारला. प्रशासनाच्या संथ व दुर्लक्षपूर्ण कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, या विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले.

या आक्रमक भूमिकेमुळे मोशीतील शाळा बांधकामाचा मुद्दा सभागृहात चांगलाच गाजला असून आता पुढील पंधरा दिवसांमध्ये संबंधित बांधकाम परवानगीबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आले आहे. येत्या पंधरा दिवसांत नक्की काय कार्यवाही होते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> “ शाळा उभारणीच्या परवानगीची फाईल महिनोनमहिने प्रलंबित ठेवणे म्हणजे थेट विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ आहे. जनतेने आम्हाला त्यांचे काम करण्यासाठी निवडून दिले आहे, पण प्रशासनाच्या दिरंगाईमुळे जर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न रखडत असेल तर हे योग्य नाही, आमचे नेते आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जनतेच्या हक्कांसाठी आणि सक्षम शिक्षण व्यवस्थेसाठी आमचा लढा अधिक ठाम आणि आक्रमक राहील.
>
> **- अर्चना सस्ते पाटील, नगरसेविका पिं. चिं. मनपा.**

### परवानगीसाठी १५ दिवसांची मुदत

मोशी येथील शाळा इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबतचा प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याचे आश्वासन प्रशासनाने सभागृहात दिले आहे. पुढील १५ दिवसांत परवानगीबाबत निर्णय घेण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले असून या कालावधीत प्रत्यक्ष कार्यवाही होते का, याकडे पालक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# एकाच सभेला दोन नगरसचिव; महापालिका अडचणीत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नुकतीच पिंपरी चिंचवड महापालिकेची सर्वसाधारण सभा पार पडली. ही सभा व त्यामध्ये झालेले विषय बेकायदेशीर आहेत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्याला महापालिकेचे नगरसचिव आणि कंत्राटी नगरसचिवाचा सुरू असलेला गोंधळ कारणीभूत आहे.**




विषय पत्रावर एका नगरसचिवाची सही तर सभेच्या पीठासनावर वेगळाच नगरसचिव असा अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे सभेत झालेले विषय कायदेशीर आहेत का? असा पेच प्रशासनाला पडला आहे.

महापालिकेचे नगरसचिव म्हणून मुकेश कोळप काम पाहत होते. मात्र, महापौर रवि लांडगे यांच्या आग्रहाखातर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कंत्राटी पद्धतीने नगरसचिव भरण्याची जाहिरात काढली. त्याची सर्व प्रक्रिया पूर्ण करून निवृत्त नगरसचिव व अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांना कंत्राटी नगरसचिव पदावर बसविण्यात आले. तसे आदेश सामान्य प्रशासन विभागाने काढले. त्यानंतर मुकेश कोळप यांना ग क्षेत्रीय कार्यालयाचा पदभार देण्यात आला. जाग आलेल्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी या नियुक्तीला आक्षेप घेतला. कंत्राटी पद असताना त्यांना प्रशासकीय आणि वित्तीय अधिकार कसे द्यायचे हा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीमध्ये देखील कोळप यांनीच काम करण्याचे आदेश बारणे यांनी दिले. त्यानुसार मागील आठवड्यात झालेल्या स्थायी समितीचे कामकाज मुकेश कोळप यांनी पाहिले तर त्यासाठीच्या विषयपत्रावर उल्हास जगताप यांच्या सह्या होत्या.

त्यानंतर सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेचे कामकाज देखील कोळप यांनी बघितले. मात्र, विषयपत्र उल्हास जगताप यांच्या सहीने प्रसिद्ध करण्यात आले होते. आता कोळप यांनी काम बघितले असले तरी त्या पदावर यापूर्वीच उल्हास जगताप यांची नियुक्ती प्रशासनाने केली आहे. तसेच आदेश देखील त्यांना देण्यात आले होते. त्यामुळे जगताप नगरसचिव असताना कोळप यांनी काम केल्याने सभा बेकायदेशीर झाला असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे याबाबत कोणी न्यायालयात दाद मागितल्यास प्रशासनासमोर कायदेशीर पेच उभा राहणार आहे.

‘नगरसचिव मुकेश कोळप यांनी सर्वसाधारण सभेचे कामकाज पाहिले आहे. कंत्राटी नगरसचिव उल्हास जगताप हे त्यादिवशी सुट्टीवर होते.’- मनोज लोणकर, सह आयुक्त.

### दोन नगरसचिवांमुळे कायदेशीर पेच


महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रावर एका नगरसचिवाची स्वाक्षरी, तर प्रत्यक्ष कामकाज दुसऱ्या नगरसचिवाने हाताळल्याने सभेच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी न्यायालयात दाद मागितल्यास सभेतील निर्णय आणि ठरावांबाबत महापालिका प्रशासनासमोर कायदेशीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## भूमिका

**राजकारणात पक्षाची ताकद केवळ विचारधारा, नेतृत्व किंवा जनाधारावर अवलंबून नसते; तर कार्यकर्ते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांना एकत्र बांधून ठेवण्याच्या क्षमतेवरही ती ठरते. शिवसेनेतील २०२२ मधील मोठी फूट आणि त्यानंतर सुरू असलेल्या घडामोडींकडे पाहिले, तर नेतृत्वशैली हा चर्चेचा महत्त्वाचा विषय ठरतो.**

# फुटीनंतरही धडा नाही; 'मातोश्री'चे राजकारण कायमच!



विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष चालविण्याच्या पद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत ऐतिहासिक फूट पडली.

या फुटीमागे राजकीय दबाव, सत्तेचे समीकरण आणि राष्ट्रीय पातळीवरील राजकारण यांचा प्रभाव होता, हे नाकारता येणार नाही. मात्र पक्षांतर्गत संवादाचा अभाव आणि नाराज नेत्यांशी प्रभावी संपर्क न राखणे, हीदेखील कारणे असल्याचे अनेकांचे मत आहे.

स्वतः उद्धव ठाकरे यांनी बंडाची कल्पना असल्याचे सांगितले, परंतु त्याला रोखण्यासाठी विशेष प्रयत्न केले नाहीत, अशी टीका त्यांच्या विरोधकांकडून केली जाते. कोणत्याही राजकीय पक्षात मतभेद असतातच; परंतु त्यांचे व्यवस्थापन हे नेतृत्वाचे कसब असते. नाराज नेत्यांशी संवाद साधणे, त्यांच्या तक्रारी ऐकणे आणि त्यांना विश्वासात घेणे आवश्यक असते.

अनेक वरिष्ठ नेते आणि आमदारांनी त्या काळात नेतृत्वाकडून अधिक संवादाची अपेक्षा व्यक्त केली होती. मात्र त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, अशी भावना निर्माण झाली.

परिणामी, पक्षातील असंतोष वाढत गेला आणि त्याचा शेवट मोठ्या फुटीत झाला. आजही परिस्थिती फारशी बदललेली दिसत नाही. काही खासदार आणि पदाधिकाऱ्यांच्या नाराजीच्या चर्चा सातत्याने पुढे येत आहेत.

दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे राज्यभर दौरे करून पक्षसंघटना मजबूत करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याउलट उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर मर्यादित संपर्कातून पक्षकारभार चालविल्याची टीका होत आहे. ही टीका कितपत योग्य किंवा अयोग्य यावर मतभेद असू शकतात; परंतु पक्षातील अस्वस्थता ही वास्तव बाब आहे.

याच ठिकाणी बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यपद्धतीचा संदर्भ दिला जातो. 'मातोश्री' हे त्यांचेही राजकीय केंद्र होते; पण तेथून चालणाऱ्या राजकारणात कार्यकर्त्यांशी असलेले भावनिक नाते आणि थेट संवाद यांना महत्त्व होते. त्यामुळे अनेक मतभेद असूनही शिवसैनिक नेतृत्वाशी जोडलेले राहिले. आजच्या परिस्थितीत मात्र तेच नाते कमकुवत होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

शिवसेनेच्या भवितव्यासाठी आता आत्मपरीक्षणाची गरज आहे. पक्ष टिकवायचा असेल, तर केवळ भावनिक आवाहन किंवा भूतकाळातील वारसा पुरेसा ठरणार नाही.

संघटनात्मक बळकटी, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि नेतृत्वाची सर्वसमावेशक भूमिका यांनाच प्राधान्य द्यावे लागेल. अन्यथा 'मातोश्री'वरील राजकारणाची चर्चा कायम राहील आणि पक्षासमोरील आव्हाने अधिक गंभीर बनतील.

## प्रासंगिक »

### गुरु केले कासवाला

**एका नगरात एक वृद्ध माणूस एकटाच राहत होता. तो छोट्या झोपडीत राहून शेतात काम करून आपली उपजीविका करत असे. त्याने एक कासव पाळले होते आणि त्याच्यावर त्याचा खूप जीव होता.**

दररोज तो कासवाची प्रेमाने काळजी घेत असे. एकदा त्याचा एक परिचित त्याला भेटायला आला. कासव पाहून तो हसत म्हणाला, "असा घाणेरडा प्राणी कशाला पाळलास?" हे ऐकून वृद्धाला वाईट वाटले. तो म्हणाला, "हे कासव माझ्या गुरुस्थानी आहे."

त्या माणसाने आश्चर्याने विचारले, "कासव गुरु कसे?" वृद्ध म्हणाला, "कासवाला संकटाची चाहूल लागली की ते आपले सर्व अवयव कवचात लपवते. त्याचप्रमाणे माणसानेही वाईट संगत, वाईट विचार आणि चुकीच्या कृतींपासून स्वतःला दूर ठेवले पाहिजे. कासव मला संयम, सावधपणा आणि आत्मसंयमाचा धडा शिकवते. म्हणून मी त्याला माझा गुरु मानतो."


- तात्पर्य : **वाईट गोष्टींची चाहूल लागताच त्यांच्यापासून दूर राहणे आणि आत्मसंयम बाळगणे हेच खरे शहाणपण आहे.**

भारतीय राजकारणात मित्रपक्षांच्या आधारावर विस्तार करणाऱ्या भाजपने आता अनेक राज्यांत स्वबळाचा मार्ग स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. पंजाबमधील अलीकडील घडामोडी त्याचेच संकेत देतात.

# अमित शाहांचा 'पंजाब पॉवर प्ले' आणि नव्या राजकारणाचे संकेत

अकाली दलाशी पुन्हा युती करण्याच्या चर्चांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिलेला स्पष्ट नकार हा केवळ राजकीय संदेश नसून भाजपच्या नव्या रणनीतीची घोषणा मानावी लागेल. पंजाबमध्ये भाजपची ओळख अनेक वर्षे अकाली दलाच्या कनिष्ठ भागीदाराची राहिली. शेतकरी आंदोलनानंतर दोन्ही पक्षांतील संबंध तुटले आणि राजकीय समीकरणे बदलली. अशा परिस्थितीत भाजप पुन्हा अकाली दलाच्या आधारावर उभे राहण्यास तयार नसल्याचे दिसते.

'भाजप कोणालाही ग्लुकोज देण्याच्या उद्योगात नाही' या कथित वक्तव्यातून शाह यांनी मित्रपक्षांना राजकीय प्राणवायू देण्याऐवजी स्वतःची ताकद वाढवण्यावर भर दिला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पंजाबमध्ये भाजपला मिळालेल्या मतांची टक्केवारी वाढवण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. मात्र हा केवळ आकड्यांचा खेळ नाही. त्यामागे राज्यात स्वतंत्र राजकीय शक्ती म्हणून उभे राहण्याची महत्त्वाकांक्षा आहे. पश्चिम बंगालमध्ये दीर्घकाळ मेहनत घेऊन भाजपने स्वतःची



जागा निर्माण केली. आता पंजाबमध्येही त्याच धर्तीवर संघटन विस्ताराचा प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षामुळे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाविषयी चर्चा रंगत आहे.

त्यांच्या पुनरागमनाची तुलना इंदिरा गांधींशी केली जात असली तरी या दोन्ही नेत्यांच्या राजकीय परिस्थितीत मूलभूत फरक आहे. इंदिरा गांधी राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व होते, तर ममता बॅनर्जी यांचा प्रभाव प्रामुख्याने पश्चिम बंगालपुरता मर्यादित आहे. तरीही संघर्षातून पुन्हा उभे राहण्याची त्यांची क्षमता नाकारता येत नाही. आगामी काळात तृणमूलमधील घडामोडी बंगालच्या राजकारणाला नवी दिशा देऊ शकतात. काँग्रेसच्या बाबतीत मात्र वेगळे चित्र दिसते. पक्षाला नवीन मुख्यालय मिळाले असले तरी '२४ अकबर रोड' या ऐतिहासिक पत्त्याशी असलेली भावनिक नाळ अजून तुटलेली नाही. दिल्लीतील सत्ताकेंद्राशी जोडलेली ही जागा काँग्रेसच्या वैभवशाली भूतकाळाचे प्रतीक मानली जाते.

मात्र राजकारणात प्रतीकांइतकेच वास्तवही महत्त्वाचे असते. जुन्या पत्त्यावरील भावनिक हक्क आणि सत्तेतील वास्तव यांच्यातील अंतर काँग्रेससमोर उभे आहे. एकंदरीत भारतीय राजकारणात सध्या तीन वेगवेगळे प्रवाह दिसत आहेत. भाजप स्वबळावर विस्ताराचा मार्ग स्वीकारत आहे, तृणमूल नेतृत्व टिकविण्याच्या संघर्षात आहे आणि काँग्रेस अजूनही भूतकाळ व वर्तमान यांच्यातील समतोल शोधत आहे. आगामी निवडणुकांमध्ये या तीन प्रवाहांचा भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम होणार, यात शंका नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥

नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मिसिंग लिंक पुलावर तीन वाहनांचा भीषण अपघात

## फॉर्च्युनरसह तीन गाड्यांची साखळी धडक; सीट बेल्ट आणि एअरबॅगमुळे सर्व प्रवासी सुरक्षित

**महाईन्यूज | अलिबाग**

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील महत्त्वाकांक्षी 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या केबल-स्टे पुलावर बुधवारी सकाळी तीन वाहनांचा भीषण साखळी अपघात झाला. या अपघातात तिन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. सर्व प्रवासी सीट बेल्ट लावून प्रवास करत असल्याने तसेच वाहनांमधील एअरबॅग वेळेवर उघडल्याने मोठी दुर्घटना टळली. या अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.**



प्राथमिक माहितीनुसार, मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणारी फॉर्च्युनर कार मिसिंग लिंकवरील केबल-स्टे पुलाजवळ तिसऱ्या लेनमध्ये अचानक थांबली. त्याचवेळी मागून भरधाव वेगाने येणाऱ्या हुंदाई वेरना कारचालकाला वाहन थांबले असल्याचा अंदाज न आल्याने त्याने फॉर्च्युनरला जोरदार धडक दिली. या धडकेचा जोर इतका होता की वेरना कार पुढे सरकत आणखी एका कारवर आदळली आणि तीन वाहनांचा साखळी अपघात झाला.

अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. तिन्ही वाहनांचे पुढील व मागील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, वाहनांमधील एअरबॅग उघडल्याने तसेच प्रवाशांनी सीट बेल्टचा वापर केल्याने सर्व जण सुखरूप बचावले. काही प्रवाशांना किरकोळ मार लागला असला तरी कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस, बोरघाट विभागाचे अधिकारी व कर्मचारी, रुग्णवाहिका तसेच संबंधित यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अपघातग्रस्त वाहनांतील प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने महामार्गाच्या बाजूला हलवून रस्ता मोकळा करण्यात आला.

या अपघातामुळे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र, पोलिस आणि यंत्रणांच्या तत्पर कार्यवाहीमुळे वाहतूक लवकरच सुरळीत करण्यात आली.

या घटनेनंतर महामार्ग पोलिसांनी वाहनचालकांना सुरक्षित अंतर राखून वाहन चालविण्याचे, अचानक ब्रेक टाळण्याचे, वेगावर नियंत्रण ठेवण्याचे आणि सीट बेल्टचा वापर अनिवार्यपणे करण्याचे आवाहन केले आहे. तसेच अत्याधुनिक महामार्गांवरही निष्काळजीपणा मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकतो, त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची गरज असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

### सीट बेल्टमुळे वाचले प्राण

मिसिंग लिंक पुलावरील भीषण साखळी अपघातात तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. मात्र, प्रवाशांनी सीट बेल्ट लावलेले असल्याने आणि वाहनांतील एअरबॅग वेळेवर उघडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेनंतर महामार्ग पोलिसांनी सुरक्षित अंतर राखणे, वेगावर नियंत्रण ठेवणे आणि वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# शेतातील काम सांगितले; नातवाने आजोबांचा जीव घेतला

**महाईन्यूज | रांजणगाव सांडस**

**शेतातील कामे वेळेत पूर्ण करण्याचा सल्ला दिल्याच्या किरकोळ कारणावरून २६ वर्षीय नातवाने आपल्या ८४ वर्षीय आजोबांची लोखंडी गजाने बेदम मारहाण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना शिरूर तालुक्यातील बाभुळसर बुद्रुक येथे सोमवारी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, आरोपी नातवाला शिरूर पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक केली आहे.**




या प्रकरणी मृताची ओळख दशरथ यशवंत राऊत (वय ८४) अशी झाली असून, त्यांचे पुत्र दुर्योधन दशरथ राऊत यांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी सोमनाथ राऊत (वय २६) याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी सात ते आठ वाजण्याच्या सुमारास राऊत कुटुंबाच्या राहत्या घरी ही घटना घडली. पावसाळा सुरू होण्यापूर्वी शेतातील कामे पूर्ण करण्याबाबत दशरथ राऊत हे नातू सोमनाथला सूचना देत होते. मात्र, काम सांगितल्याचा राग मनात धरून सोमनाथने संतापाच्या भरात लोखंडी गज उचलून आजोबांच्या डोक्यावर व पाठीवर सपासप वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यात दशरथ राऊत गंभीर जखमी झाले. डोक्यावर आणि शरीरावर गंभीर मार लागल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेनंतर घरातील सदस्यांनी आणि ग्रामस्थांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. गुन्हा घडल्यानंतर काही वेळातच आरोपी सोमनाथ राऊत याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक दिलीप पवार करीत आहेत.

शेतातील कामकाजाबाबत सूचना दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून नातवाने स्वतःच्या आजोबांचा जीव घेतल्याची घटना बाभुळसर बुद्रुक परिसरात हळहळ व्यक्त करणारी ठरली आहे. या घटनेमुळे कौटुंबिक नातेसंबंधांतील वाढता तणाव आणि क्षणिक रागातून घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.

### क्षणिक राग ठरला जीवघेणा

शेतातील कामे वेळेत पूर्ण करण्याचा सल्ला दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून २६ वर्षीय नातवाने ८४ वर्षीय आजोबांवर लोखंडी गजाने हल्ला केला. डोक्यावर आणि पाठीवर गंभीर वार झाल्याने आजोबांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर शिरूर पोलिसांनी आरोपी नातवाला तातडीने अटक करून खुनाचा गुन्हा दाखल केला.

# डार्लिंग आता बस झालं...

## सतत 'पुरावा' मागत महिला पत्रकारानं ट्रम्प यांना चांगलंच केलं हैराण

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांचा एक व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे. यात डोनाल्ड ट्रम्प एका लाईव्ह मुलाखतीतून उठून जाताना दिसत आहे. ते मुलाखतकार महिला पत्रकारावर चांगलेच भडकेले दिसत आहेत. तर दुसरीकडे महिला पत्रकाराने देखील डोनाल्ड ट्रम्प यांना कात्रीत पकडत आपल्या प्रश्नावर ठाम असल्याचं दिसत आहे.**



डोनाल्ड ट्रम्प यांनी एनबीसी अँकर क्रिस्टिन वेल्कर यांना अप्रमाणिक, स्टुपीड म्हणत तो इंटरव्ह्यू सोडला. अँकर क्रिस्टिन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅलिफोर्नियामध्ये संथ मतमोजणी सुरू असल्यावरून टीका केली होती. त्यावेळी त्यांनी या निवडणुकीत गोंधळ झाला असल्याचा दावा केला. यावर पत्रकार क्रिस्टिन यांनी पुरावे द्या तुम्ही पुरावे देत नाहीये असं म्हणत ट्रम्प यांना चांगलंच घेरलं.

डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅलिफोर्निया मतमोजणीवर आक्षेप नोंदवताच पत्रकार क्रिस्टिन यांनी कारण ते बॅलट पेपरची टॅली करत आहेत त्यामुळं उशीर होत आहे असं सांगितलं. त्यावेळी ट्रम्प यांनी तुम्हाला माहिती आहे का ते असं का करत आहेत? कारण ते निवडणुकीत घोटाळा करत आहेत.'

यानंतर पत्रकार क्रिस्टिन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे थेट पुरावा मागितला. त्यावर डोनाल्ड ट्रम्प चाचपडले आणि त्यांनी मी असं लोकांकडून ऐकलं आहे असं सांगितलं. त्यावर हा काही पुरावा नाही असं म्हणत डोनाल्ड ट्रम्प यांना घेरलं. त्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी मतदानानंतर पाच दिवस मतमोजणी चालणे हे योग्या आहे का असा प्रश्न विचारला. ते अजूनही विजेता निवडू शकलेले नाहीत असं सांगितलं.

यावर पत्रकाराने प्रक्रिया संथ आहे मात्र कॅलिफोर्नियाचे अधिकारी यावर काम करत आहेत असं सांगितलं. त्यावर कॅलिफोर्नियाचे निवडणूक अधिकारी हे अप्रमाणिक असून तुम्ही पत्रकार आणि तुमचे पत्रकार मित्र देखील अप्रामाणिक असल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला.

ट्रम्प म्हणाले, ते तुमच्याप्रमाणेच अप्रमाणिक आहेत तुमचा मीडिया हा अप्रमाणिक आहे. मीट द प्रेस हे देखील अप्रामाणिक आहे. निवडणुकीच्या बाबतीत अमेरिका हा अप्रगत देशांसारखा आहे असं देखील ट्रम्प यांनी सांगितलं.

त्यावर पत्रकार क्रिस्टिन यांनी, मी अप्रामाणिक नाही. त्यावर ट्रम्प यांनी तुम्ही एकतर अप्रामाणिक आहात किंवा मूर्ख आहात. तुम्ही तुम्ही त्यांच्या हातातील बाहुलं आहात. तुम्हीला माहिती आहे की ही निवडणूक एक घोटाळा आहे. तुमच्या नेटवर्कला माहिती आहे की हा घोटाळा आहे.

### डोनाल्ड ट्रम्प मुलाखतीतून गेले ऊठून

या दरम्यान, पत्रकार याचे सतत पुरावे मागत राहिली. मात्र डोनाल्ड ट्रम्प यांनी पुरावे न देता मुलाखत अर्ध्यात सोडून जाणंच पसंत केलं. ते मुलाखत सोडून देताना म्हणाले, 'माफ करा, तुम्ही याला मी सोडून गेलो असं म्हणता मात्र आता बस झालं. आभारी आहे डार्लिंग. तुम्हाला दिवस चांगला जावो.' असं म्हणतं ट्रम्प यांनी माईक काढला आणि जमिनीवर फेकून दिला. मुलाखतीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला असून, ट्रम्प यांच्या या वागणुकीवर विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.


---

# आधी तृणमूल, मग ठाकरेंची सेना आणि आता समाजवादी पक्षात फुट पडणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधील राजकीय भूकंपानंतर आता उत्तर प्रदेशच्या राजकारणातही मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षानंतर आता अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षातही मोठी फूट पडणार.**







असल्याचा दावा उत्तर प्रदेश सरकारमधील मंत्री ओमप्रकाश राजभर यांनी केला आहे.

समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते रामगोपाल यादव यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना एक पत्र लिहिल्याचा दावा राजभर यांनी केला असून, यामुळे यूपीच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

सुहेलदेव भारतीय समाज पक्षाचे (SBSP) अध्यक्ष आणि यूपीचे मंत्री ओ. पी. राजभर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. राजभर म्हणाले, “फक्त महाराष्ट्रातील घडामोडींवर लक्ष ठेवू नका, आता उत्तर प्रदेशची पाळी आहे. रामगोपाल यादव यांनी गृहमंत्री अमित शाह यांना एक पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी सपाच्या काही खासदारांची नावे दिली असून, ‘या खासदारांना तुमच्यासोबत घ्या’ अशी विनंती केली आहे.”

राजभर यांनी पुढे दावा केला की, रामगोपाल यादव यांनी त्या पत्रात नेमके काय लिहिले आहे, हे जनतेसमोर जाहीर करावं. अखिलेश यादव यांचे नाव एका खाण घोटाळ्याच्या चौकशीत आल्यामुळेच ही बचावात्मक पावले उचलली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. “सीबीआयने खाण घोटाळ्यात अखिलेश यांचे नाव घेतले आहे. गोमती रिव्हरफ्रंट घोटाळ्यात अद्याप कोणी तुरुंगात गेले का?” असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ओ. पी. राजभर यांच्या या खळबळजनक दाव्यानंतर समाजवादी पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. सपाचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. अनुराग भदोरिया यांनी हे सर्व आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. “राजभर यांना नक्की काय झाले आहे, हे मला माहीत नाही. ते समाजवादी पक्षाबाबत अत्यंत बिनबुडाचे आणि तथ्यहीन दावे करत आहेत,” अशा शब्दांत भदोरिया यांनी पलटवार केला.

### विरोधी पक्षांमध्ये अस्वस्थता

सध्या देशभरातील प्रमुख विरोधी पक्षांमध्ये मोठी पडझड होताना दिसत आहे. एकीकडे उत्तर प्रदेशात सपाबाबत दावे-प्रतिदावे केले जात असताना, दुसरीकडे महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमध्येही विरोधी पक्षांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. एकंदरीतच आधी ममता बॅनर्जी, मग उद्धव ठाकरे आणि आता अखिलेश यादव यांच्या पक्षाला लागलेले सुरुंग पाहता, आगामी काळात देशाच्या राजकारणाला कोणती नवी दिशा मिळते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# 'ती दुसऱ्या जनरेशनची आंटी'



बॉलिवूडमधील एक जुना आणि गाजलेला किस्सा म्हणजे जेव्हा अभिनेत्री सोनम कपूर हिने नुकतेच फिल्म इंडस्ट्रीमध्ये पदार्पण केले होते. तेव्हा तिने ऐश्वर्या रायला 'आंटी' म्हटलेलं जे ऐकून अनेकांना धक्का बसलेला. या विधानामुळे त्यावेळी मोठा गदारोळ झाला होता आणि सोनमला भरपूर ट्रोल केले गेले होते. सोनमने ऐश्वर्याला 'आंटी' का म्हटले, त्यामागे तिने काय कारण दिले आणि कालांतराने त्या दोघींमधील कटुता कशी संपली, हे जाणून घेऊ. हा 2009 मधला किस्सा आहे. तेव्हा सोनम कपूरने नुकतेच इंडस्ट्रीत पदार्पण केले होते. एका प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय सौंदर्य प्रसाधने ब्रँडचा 'नवा चेहरा' म्हणून तिची निवड करण्यात आली होती. ऐश्वर्या राय आधीपासूनच अनेक वर्षांपासून त्या ब्रँडची मुख्य ब्रँड ॲम्बेसेडर होती. ऐश्वर्याच्या जागी एका नवीन आणि तरुण चेहऱ्याला पुढे आणण्याची कंपनीची इच्छा असल्याचे म्हटले जात होते. याच गोष्टीमुळे हा संपूर्ण वाद निर्माण झाला. जेव्हा प्रसारमाध्यमांनी सोनम कपूरला या बदलाबाबत आणि ऐश्वर्या रायबद्दल विचारले, तेव्हा तिने केलेले विधान ऐकून सगळेच अवाक झाले. तिने ऐश्वर्या रायचा उल्लेख "दुसऱ्या जनरेशनची आंटी" असा केला. त्यावेळी ऐश्वर्याचे वय अवघे 36 वर्षे होते, तर सोनम 25 वर्षांची होती. वयात केवळ 11 वर्षांचे अंतर असूनही, सोनमने ऐश्वर्याला 'आंटी' म्हटलेले लोकांना अजिबात आवडले नव्हते. या विधानानंतर वाद चांगलाच वाढला आणि लोकांनी सोनमविरोधात 'ट्रोलिंग' सुरू केली, तेव्हा तिने एक वेगळेच स्पष्टीकरण दिले. एका मुलाखतीत बोलताना सोनम कपूर म्हणाली, "ऐश्वर्या रायने माझ्या वडिलांसोबत, म्हणजेच अनिल कपूर यांच्यासोबत चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्या अर्थाने, आमच्या कुटुंबातील माझ्या आधीच्या पिढीतील ती व्यक्ती ठरते; त्यामुळे साहजिकच मला तिला 'आंटी'च म्हणावे लागेल ना?" सोनमचा युक्तिवाद लोकांना पटला नाही. सोशल मीडियावर चाहत्यांनी तिच्यावर कडक टीका केली. काही लोक म्हणाले की, सोनमने स्वतः तिच्यापेक्षा वयाने खूप मोठ्या असलेल्या अभिनेत्यांसोबत सिनेमांमध्ये काम केले आहे. उदाहरणार्थ सलमान खान, जो तिच्या वडिलांचा मित्र आहे. या पार्श्वभूमीवर, ऐश्वर्याला 'आंटी' म्हणणे हे केवळ सोनमच्या उद्धटपणाचे लक्षण आहे. सर्व वाद आणि गदारोळात ज्या गोष्टीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, ती म्हणजे ऐश्वर्या रायची शांतता. सोनम कपूरने केलेल्या 'आंटी' या टिप्पणीला ऐश्वर्याने कधीही उघडपणे प्रत्युत्तर दिले नाही; तिने या विषयावर पूर्णपणे मौन बाळगले आणि त्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.



## 'अल्फा'च्या दोन अभिनेत्री एका फ्रेममध्ये

बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ सध्या त्यांच्या आगामी 'अल्फा' चित्रपटामुळे चांगल्याच चर्चेत आहेत. नुकतेच आलियाने सोशल मीडियावर शर्वरीसोबत काही खास फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये दोघींचा एकसारखा लूक पाहून चाहते अक्षरशः भारावून गेले आहेत. अनेकांनी त्यांना 'जुळ्या बहिणी' अशी उपमा दिली आहे. 'अल्फा' हा यशराज फिल्म्सच्या स्पाय युनिव्हर्समधील महत्त्वाचा चित्रपट आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला होता. त्यानंतर आता आलियाने शर्वरीसोबतचे काही नवीन फोटो शेअर करत चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढवली आहे. या फोटोंमध्ये आलिया आणि शर्वरी दोघींनीही पांढऱ्या रंगाचा एकसारखा 'अल्फा' प्रिंट असलेला टी-शर्ट परिधान केला आहे. दोघींची स्टाईल, पोझ आणि एकूणच लूक इतका जुळून आला आहे की, सोशल मीडियावर या फोटोंची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. फोटो शेअर करताना आलियाने मजेशीर कॅप्शन दिले. तिने, "शर्वरी कुठे आहे?" असे लिहिले. त्यावर शर्वरीनेही लगेच उत्तर देत, "हजर आहे मॅडम," अशी प्रतिक्रिया दिली. दोघींमधील ही हलकीफुलकी मैत्री चाहत्यांना खूप आवडली. फोटोंमध्ये दोघींनी काळ्या रंगाचा गॉगल लावून स्टायलिश पोझ दिली आहे. दोघींच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास आणि एकमेकांशी असलेले छान बॉन्डिंग स्पष्टपणे दिसून येत आहे. हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत.

# मराठी चित्रपटात सस्पेन्सचा नवा प्रयोग!





मराठी चित्रपटसृष्टीत वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असताना आता आणखी एक रहस्यमय आणि थरारक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सई ताम्हणकर, सुबोध भावे, चिन्मय मांडलेकर आणि संभाजी ससाणे यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'बोल बोल राणी' हा चित्रपट 10 जुलै रोजी प्रदर्शित होणार असून, नुकताच या चित्रपटाचा जबरदस्त टीझर प्रदर्शित झाला आहे. टीझरने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. या चित्रपटाचे खास आकर्षण म्हणजे तब्बल 15 वर्षांनंतर सई ताम्हणकर, सुबोध भावे आणि चिन्मय मांडलेकर हे त्रिकुट पुन्हा एकदा एकत्र झळकणार आहे. त्यामुळे चित्रपटाबद्दल चाहत्यांमध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. 'बोल बोल राणी' हा केवळ सस्पेन्सपट नसून एका महिलेभोवती फिरणाऱ्या गूढ रहस्याचा थरारक प्रवास आहे. रहस्य, थ्रिल आणि अनपेक्षित घटनांनी भरलेली कथा प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवणार असल्याची झलक टीझरमधून पाहायला मिळते. विशेषतः सई ताम्हणकरचे विविध लूक आणि तिच्या पात्राभोवतीचे गूढ वातावरण लक्ष वेधून घेत आहे. चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक सिड विंचुरकर म्हणाले, "थ्रिलर म्हणजे केवळ भीती निर्माण करणं नव्हे, तर प्रेक्षकांच्या मनात प्रश्न निर्माण करून त्यांना शेवटपर्यंत गुंतवून ठेवणं. या चित्रपटातील प्रत्येक दृश्य, प्रत्येक शांतता आणि प्रत्येक आवाजामागे एक वेगळा अर्थ दडलेला आहे. प्रेक्षकांनी एका वेगळ्या थरारक अनुभवासाठी सज्ज राहावं." अपूर्वा मोतिविले सहाय, सिड विंचुरकर आणि अमित भानुशाली यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर यश मोदी, शब्बीर सबुवाला, रचना वोरा, तपन विचारे, यश राम शाहानी आणि आयुष कृप्लानी हे सहनिर्माते आहेत. सई ताम्हणकर, सुबोध भावे, चिन्मय मांडलेकर आणि संभाजी ससाणे यांच्या दमदार अभिनयाने सजलेला 'बोल बोल राणी' 10 जुलै रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# टायगर इज बॅक! लिओनेल मेस्सीची हॅट्रिक

## अमेरिकेतील कन्सास सिटी स्टेडियममध्ये रोनाल्डोच्या खास रेकॉर्डची देखील केली बरोबरी

**महाईन्यूज । अमेरिका**

**ज्या सामन्याची अर्धे जग वाट पाहत होतं तो सामना अखेर अमेरिकेतील कन्सास सिटी स्टेडियममध्ये झाला. अर्जेंटिनाचा स्टार कर्णधार लिओनेल मेस्सी हा पहिला सामना खेळणार की नाही याबाबत साशंकता होती. त्याच्या पाठीला दुखापत झाल्यामुळं तो मैदानात उतरण्याची शक्यता कमी असल्याचे बोलले जात होते.**



मात्र मेस्सी मैदानात उतरला आणि वर्ल्डकपचा टायगर पुन्हा आलाय हे डरकाळी फोडून सांगितलं. तिकडं एम्बाप्पे हॅट्रिक करत असताना अर्जेंटिनाचा मेस्सी कुठं मागे रहातोय.... त्यानं देखील अल्जेरियाविरुद्धच्या आपल्या सलामीच्या सामन्यातच ३ गोल करत धमाका केला.

लिओनेल मेस्सीने १७ व्या मिनिटाला पहिला गोल करत यंदाच्या वर्ल्डकपमधील आपलं खातं उघडलं. त्यानंतर त्याने दुसऱ्या हाफमध्ये दोन गोलं करत अर्जेंटिनाला ३-० असा विजय मिळवून दिला.

याचबरोबर मेस्सीने अनेक विक्रमांना देखील गवसणी घातली आहे. मेस्सी आता पुरुषांच्या फुटबॉल वर्ल्डकप इतिहासात सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत संयुक्तरित्या तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे. त्याचबरोबर पाच वेगवेगळ्या वर्ल्डकपमध्ये गोल करणारा मेस्सी आता क्रिस्तियानो रोनाल्डोबरोबरचा दुसरा खेळाडू ठरला आहे.

आठवेळा बालॉन डओर पुरस्कार जिंकणारा मेस्सी आता सहा वर्ल्डकप खेळणारा पहिला खेळाडू देखील ठरला आहे. या विक्रमाची बरोबरी मेस्सीचा कट्टर प्रतिस्पर्धी रोनाल्डो याच वर्ल्डकपमध्ये करणार आहे. तो जर कांगो सोबतच्या गुरूवारच्या सामन्यात खेळला तर तो या विक्रमाशी बरोबरी करणार आहे.

मेस्सीने अजून एक माईलस्टोन पार केला आहे. तो आता फुटबॉल इतिहासातला त्याच्या देशाकडून २०० आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा तिसरा खेळाडू ठरला आहे. यापूर्वी रोनाल्डोने २२८, बदर अल मुतावा २०२ त्यानंतर लिओनेल मेस्सी २०० आपल्या देशाकडून २०० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. फिफा वर्ल्ड कप २०२६ मध्ये अर्जेंटिनाने पहिल्याच सामन्यात विजय मिळवून स्पर्धेत दिमाखात पाऊल ठेवले आहे. कॅन्सस सिटीच्या जीईएचए फील्ड ॲट ॲरोहेड स्टेडियम'वर रंगलेल्या या थरारक सामन्यात, अर्जेंटिना संघाने अल्जीरियाचा ३-० असा धुव्वा उडवला. पण, ही फक्त अर्जेंटिनाची मॅच नव्हती, तर हा शो होता फक्त आणि फक्त 'लिओनेल मेस्सी'चा होता. २०० व्या ऐतिहासिक सामन्यात मेस्सीने मैदानावर असा काही खेळ दाखवला की, अल्जीरियाचे खेळाडू नुसतेच पाहत राहिले. मेस्सीने आपल्या विश्वचषक कारकिर्दीत हॅट्रिक नोंदवत फुटबॉल विश्वातील अनेक विक्रम मोडीत काढले.

### मेस्सीचा लॉन्ग रेंज स्क्रिमर'

सामन्याच्या १७ व्या मिनिटाला मेस्सीला रॉड्रिगो डी पॉलने अल्जीरियाची डिफेन्स लाईन भेदत अचूक पास दिला. अल्जीरियाच्या खेळाडूंनी घेरलेले असतानाही ३८ वर्षीय मेस्सीने डाव्या पायाने एक अप्रतिम शॉट' मारला. अल्जीरियाचा गोलकीपर लुका झिदान याला चुकवून बॉल थेट टॉप-राईट कॉर्नरमध्ये गेला आणि अर्जेंटिनाला पहिला गुण मिळाला. महत्त्वाचे म्हणजे मेस्सीने १६ जून २००६ रोजी सर्बिया आणि मॉंटेनिग्रोविरुद्ध आपला पहिला वर्ल्ड कप गोल केला होता. बरोबर २० वर्षांनंतर, त्याच तारखेच्या आसपास मेस्सीने पुन्हा इतिहास लिहिला.

# अफगाण 'अ' संघाला नमवत भारत 'अ' अंतिम फेरीत; श्रीलंकेतील तिरंगी मालिका

**महाईन्यूज । डम्बुला**

**तिलक वर्मा, प्रियांश आर्य आणि कुमार कुशाग्र यांच्या अर्धशतकांनंतर गोलंदाजांच्या सांघिक कामगिरीच्या जोरावर भारत 'अ' संघाने तिरंगी मालिकेत अफगाणिस्तान 'अ' चा १०१ धावांनी धुव्वा उडवला. प्रथम फलंदाजी करताना भारताने ९ बाद ३१९ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात अफगाणचा डाव ३६.५ षटकांत २१८ धावांवर आटोपला. या मोठ्या विजयासह भारताने ४ गुणांसह थेट अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.**




प्रथम फलंदाजीचे निमंत्रण मिळाल्यानंतर सलामीवीर वैभव सूर्यवंशी (३८) आणि प्रियांश आर्य (५८) यांनी अवघ्या ८ षटकांत ७५ धावांची वेगवान भागीदारी करत संघाला धडाकेबाज सुरुवात करून दिली. त्यानंतर कर्णधार तिलक वर्मा (५९) आणि कुमार कुशाग्र (५८) यांनी चौथ्या विकेटसाठी १०४ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत डाव सावरला. ३२० धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना अफगाणचा संघ एकदाही विजयाच्या ट्रॅकवर दिसून आला नाही. डावखुरा फिरकीपटू निशांत सिंधूने ६.५ षटकांत ३१ धावा देऊन ४ बळी घेतले.

भारत 'अ': ५० षटकांत ९ बाद ३१९ (तिलक वर्मा ५९, प्रियांश आर्य ५८, कुमार कुशाग्र ५८; अब्दुल्लाह अहमदझाई २/६२) अफगाणिस्तान 'अ': ३६.५ षटकांत सर्वबाद २१८ (बहिर शाह ५७, फैसल शिनोझादा ४६; निशांत सिंधू ४/३१, यश ठाकूर २/४८)

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वनक्षेत्र साकोलीच्या वन्यप्राणी बचाव दलाला (शिघ्र कृती दल) घटनास्थळी पाचारण करण्यात आले. दलाने घटनास्थळाची सखोल पाहणी करून पाईपच्या एका बाजूस पिंजरा बसविला. अत्यंत संयम, कौशल्य आणि नियोजनाचा वापर करत बिबट्याला कोणतीही इजा न होता सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यात आले. वनविभागाच्या या तत्पर आणि व्यावसायिक कार्यपद्धतीचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

यानंतर एनएनटीआरचे पशुधन विकास अधिकारी मेघराज तुलावी यांनी बिबट्याची आरोग्य तपासणी केली. तपासणीत सदर बिबट (नर) पूर्णतः शारीरिकदृष्ट्या सुदृढ असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले.

### अफगाणिस्तानचा डाव कोलमडला

भारत 'अ'च्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत अफगाणिस्तानसमोर ३२० धावांचे आव्हान उभे केले. वैभव सूर्यवंशी, प्रियांश आर्य, तिलक वर्मा आणि कुमार कुशाग्र यांच्या दमदार अर्धशतकांच्या जोरावर संघाने भक्कम धावसंख्या उभारली.प्रत्युत्तरात अफगाणिस्तानच्या फलंदाजांना भारतीय गोलंदाजांसमोर फार काळ टिकाव धरता आला नाही. बहिर शाह आणि फैसल शिनोझादा यांनी काही प्रमाणात प्रतिकार केला, मात्र इतर फलंदाज अपयशी ठरले.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज
epaper.mahaenews.com
ePaper
। गुरुवार ।
दि. 18 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ‘महाईन्यूज’च्या मुख्य संपादकपदी आदक, तर कार्यकारी संपादकपदी कोकाटे...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

महाराष्ट्रातील नामांकित डिजिटल न्यूज पोर्टल व ई-पेपर ‘महाईन्यूज’मध्ये महत्त्वपूर्ण संपादकीय बदल करण्यात आले असून, मुख्य संपादकपदी अविनाश आदक, तर कार्यकारी संपादकपदी भाऊसाहेब कोकाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी घोषणा ‘महाईन्यूज’चे संस्थापक, संपादक अधिकराव दिवे-पाटील यांनी केली आहे. त्यांनी दोन्ही संपादकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

अविनाश आदक हे गेल्या १२ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असून, त्यांनी प्रिंट, डिजिटल व ई-पेपर माध्यमांतून सातत्याने प्रभावी कामगिरी केली आहे. गेल्या दोन वर्षांपासून ते ‘महाईन्यूज’मध्ये कार्यकारी संपादक म्हणून जबाबदारी सांभाळत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली ‘महाईन्यूज’ने विश्वासार्ह, निर्भीड आणि लोकहिताच्या पत्रकारितेची ओळख अधिक मजबूत केली. त्यांच्या अनुभव, अभ्यासू दृष्टीकोन आणि संघटनात्मक कौशल्यामुळे मुख्य संपादकपदाच्या माध्यमातून ‘महाईन्यूज’ला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. कार्यकारी संपादकपदी नियुक्त झालेले भाऊसाहेब कोकाटे हे राज्यभरात नामांकित मुलाखतकार, व्याख्याते व निवेदक म्हणून परिचित आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व साहित्य क्षेत्रातील घडामोडींवर त्यांचा सखोल अभ्यास आहे. त्यांच्या वैचारिक मांडणीमुळे आणि परखड पत्रकारितेमुळे ‘महाईन्यूज’च्या आशयाला अधिक व्यापकता व सखोलता लाभणार आहे.

> “पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याचे माध्यम नसून समाजाचा आरसा आणि लोकशाहीचा पहारेकरी आहे. सत्य, निर्भीडता आणि लोकहित या मूल्यांशी कोणतीही तडजोड न करता वाचकांचा विश्वास जपणे, हीच माझी प्राथमिक जबाबदारी आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातील घडामोडींचे संतुलित, अभ्यासपूर्ण आणि वस्तुनिष्ठ मांडणीद्वारे सामान्य नागरिकांचा आवाज बुलंद करणे, हेच माझे ध्येय आहे. ‘लढाई सत्याची, लोकशाहीच्या हक्काची’ या ब्रीदवाक्याला कृतीतून अर्थ देत ‘महाईन्यूज’ला अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि प्रभावी व्यासपीठ बनवण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने कार्य करीन.”
>
> \- भाऊसाहेब कोकाटे, कार्यकारी संपादक, ‘महाईन्यूज’, पुणे.


भाऊसाहेब कोकाटे यांनी कार्यकारी संपादकपदाची जबाबदारी स्वीकारल्याने ‘महाईन्यूज’च्या “लढाई सत्याची, लोकशाहीच्या हक्काची” या ब्रीदवाक्याला अधिक बळ मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. मुख्य संपादक अविनाश आदक आणि कार्यकारी संपादक भाऊसाहेब कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली ‘महाईन्यूज’ सत्य, निर्भीडता आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करणारी पत्रकारिता अधिक प्रभावीपणे मांडेल, असा विश्वास वर्तविण्यात येत आहे.





D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026




*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

*UG/PG Programs*
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# देहू-आळंदी पंचक्रोशीला 'संतभूमी'चा दर्जा

## आमदार शंकर जगताप यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र देहू आणि श्री क्षेत्र आळंदी या पवित्र भूमीला 'संतभूमी' म्हणून घोषित करावे, अशी आग्रही मागणी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**




आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राला संतांची मोठी परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर माउलींची संजीवन समाधी आळंदी येथे, तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे वास्तव्य आणि वैकुंठगमन देहू येथे झाले आहे. या दोन्ही ठिकाणांमधील १६ किलोमीटरचा परिसर वारकरी परंपरा, अध्यात्म आणि संत साहित्याने समृद्ध आहे. लाखो भाविकांचे हे अत्यंत श्रद्धेचे केंद्र असल्याने, या परिसराचे जतन आणि गौरव करणे काळाची गरज असल्याचे आमदार जगताप यांनी पत्रात नमूद केले आहे. या पवित्र परिसराला 'संतपीठ' म्हणून अधिकृत दर्जा दिल्यास धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने मोठी चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले आहे. यामुळे संत परंपरेचा ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारसा जतन करण्यासह भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा अधिक प्रभावीपणे विकसित करता येतील.

> "संत ज्ञानेश्वर माउली आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली ही भूमी वारकरी संप्रदायाचा श्वास आहे. या परिसराचा सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा जपणे ही काळाची गरज असून, 'संतभूमी'चा दर्जा ही त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल असेल."उत्तराखंडच्या धर्तीवर देहू ते आळंदी या पंचक्रोशीला 'संतभूमी' म्हणून घोषित करणे, हे महाराष्ट्राच्या अध्यात्मिक परंपरेचा सन्मान ठरेल. यामुळे लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेचे प्रतीक असलेल्या या क्षेत्राचा सर्वांगीण गौरव वाढेल."
>
> **- शंकर जगताप, भाजपा आमदार, चिंचवड विधानसभा.**

### उत्तराखंडच्या धर्तीवर देवभूमीची मागणी

उत्तराखंड राज्याने ज्याप्रमाणे आपल्या परिसराचा 'देवभूमी' म्हणून गौरव केला आहे, त्याच धर्तीवर देहू ते आळंदी या पंचक्रोशीला 'संतभूमी' म्हणून कायदेशीर दर्जा मिळावा, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि वारकरी समाजातून होत आहे. याचा गांभीर्याने विचार करून सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार जगताप यांनी पत्राद्वारे केली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा गौरव वाढण्यासोबतच, वारकरी संप्रदायाचा सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे.

---

# म्हाडा इमारतीतील गॅलरीत अडकलेल्या विद्यार्थिनीची अग्निशामक दलाकडून सुखरूप सुटका

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**संत तुकाराम नगर येथील म्हाडा इमारतीमध्ये राहणारी एक महाविद्यालयीन विद्यार्थिनी गॅलरीचा दरवाजा अचानक लॉक झाल्यामुळे गॅलरीत अडकून पडल्याची घटना बुधवारी पहाटे घडली. सकाळी सुमारे ५ ते ६ वाजण्याच्या दरम्यान घडलेल्या या प्रकारामुळे विद्यार्थिनी चांगलीच घाबरून गेली होती.**



घटनेची माहिती मिळताच स्थानिक नगरसेविका सौ. सुजाता ताई पालांडे यांनी तात्काळ अग्निशामक दलाशी संपर्क साधून मदत मागवली. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक जवानांनी शिडीच्या सहाय्याने इमारतीच्या गॅलरीपर्यंत पोहोचत अत्यंत दक्षतेने बचावकार्य राबविले. सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर विद्यार्थिनीची सुखरूप सुटका करण्यात आली. या घटनेदरम्यान परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे कोणतीही जीवितहानी टळली. या बचाव मोहिमेत प्रमुख अग्निशामक विठ्ठल सपकाळ, डी.सी.ओ. सत्यम चौकांडे, अग्निशामक दिग्विजय पवार, अक्षय खैरे, शुभम मुळीक, नागेश सरकाळे आणि राजदीप चव्हाण यांनी मोलाची कामगिरी बजावली. तसेच सुनील पालांडे, प्रथमेश रूपनर आणि अनिकेत खेडेकर यांनीही विशेष सहकार्य केले. स्थानिक नागरिकांनी अग्निशामक दलाच्या तत्परतेचे तसेच नगरसेविका सौ. सुजाता ताई पालांडे यांच्या त्वरित हस्तक्षेपाचे कौतुक केले.

# भोसरीत मोकळी मैदाने मद्यपींचे अड्डे

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

परिसरातील महापालिकेची मोकळी मैदाने, उद्याने आणि निर्जन जागा मद्यपींचे अड्डे बनत चालले आहेत. सायंकाळनंतर या ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांची संख्या वाढत असून, परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच काही महाविद्यालयीन युवकांचाही या ठिकाणी वावर वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. याकडे संबंधित प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच मोकळी मैदाने, इमारती सुरक्षित करणे गरजेचे आहे.

महापालिकेच्या मोकळ्या मैदानात, इमारतींमध्ये दारूच्या मोकळ्या बाटल्या व काचा, प्लास्टिकचे ग्लास, सुया पडलेल्या आहेत. परिणामी परिसराचे विद्रुपीकरण होत असून, स्वच्छतेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पालिका प्रशासनाने या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत उपाययोजना करण्याची मगणी नागरिकातून होत आहे. महापालिकेच्या वतीने परिसरात नवीन मैदाने, आळंदी रस्त्यावर वाहनतळ, भोसरी रुग्णालय बाजूला नव्याने बांधलेली इमारत आदींचा विकास नागरिकांचा सोयीसाठी केला आहे. परंतु, याठिकाणी पालिका प्रशासनाकडून योग्य अमलबजावणी व कारवाई न झाल्याने वाहनतळ व इमारत धूळ खात पडली आहे. नवीन मैदानाचे काम अर्धवट स्थितीत असल्याने या ठिकाणी पालिकेने ताबा घेण्याआधीच तळीरामांनी कब्जा घेतला आहे.

> मोकळ्या जागा आणि मैदाने दारू पिण्याचे अड्डे बनू नयेत. महापालिकेने अशा ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमून नियमित गस्त वाढवावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून नागरिकना सुरक्षित वातावरण दिले पाहिजे.
>
> **- सागर गवळी, नगरसेवक**

# कष्टकरी बांधवांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## पिंपरीत रिक्षा-टॅक्सी-कॅब चालकांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**रिक्षा, टॅक्सी व कॅब चालक बांधवांच्या आरोग्य संवर्धनासाठी पिंपरीत मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. मोरवाडी मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या या शिबिराचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखात पार पडले.**



> “दिवस-रात्र ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता नागरिकांची सेवा करणाऱ्या रिक्षा, टॅक्सी आणि कॅब चालक बांधवांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते, ही खेदाची बाब आहे. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी होणे आणि त्यांना वेळेवर उपचार मिळणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. समाजातील तळागाळातील या कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी आम्ही नेहमीच ठामपणे उभे राहू आणि अशा आरोग्य उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देत राहू.”
>
> **- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (MNGL), महाराष्ट्र रिक्षा पंचायत आणि शिवरुद्र प्रतिष्ठान (ट्रस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमाला चालक बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पहिल्याच दिवशी तब्बल २०० हून अधिक रिक्षा, टॅक्सी व कॅब चालकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष तथा ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांच्या हस्ते शत्रुघ्न (बापू) काटे यांचा संत तुकाराम महाराज यांची पगडी देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले की, “दिवस-रात्र ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता नागरिकांना सेवा देणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. या कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी काम करणे हेच आमचे ध्येय आहे. समाजसेवेच्या भावनेतून अशा उपक्रमांना आम्ही नेहमीच पाठिंबा देत राहू.” MNGL, महाराष्ट्र रिक्षा पंचायत आणि शिवरुद्र प्रतिष्ठान यांच्या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक करत त्यांनी या उपक्रमामुळे चालकांना वेळेवर आरोग्य तपासणी व मोफत चष्मे मिळतील, असेही नमूद केले.

दरम्यान, शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमद्वारे डोळ्यांची तपासणी, रंग आंधळेपणा चाचणी, मोतीबिंदू तपासणी, दृष्टीदोष तपासणी तसेच रक्तातील साखर (रँडम शुगर) तपासणी अशा विविध सेवा पूर्णपणे मोफत देण्यात आल्या. गरजूंना मोफत चष्मेही वाटप करण्यात आले.

डॉ. बाबा कांबळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली असंघटित कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या जात असून, अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन महिनाभर शहरातील विविध भागांत केले जाणार आहे.

युवा नेते शुभम कांबळे यांनी चालकांच्या आरोग्य समस्यांकडे लक्ष वेधत, धूळ, प्रदूषण आणि दीर्घकाळ वाहन चालवण्यामुळे डोळ्यांचे विकार वाढत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे युवक अध्यक्ष शुभम तांदळे, शिवरुद्र प्रतिष्ठानचे राहुल पाखरे, पुणे शहर युवक अध्यक्ष विशाल ससाने, पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष भाऊसाहेब शेलार, तसेच विद्यार्थी विभागाचे प्रदीप आयर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मारवाडी मेट्रो विभाग उपाध्यक्ष श्याम मोरे, उमेश पवार, जयेश गायकवाड, महेश शिंदे, वैभव सरोदे, गणेश नवगिरे, मल्लेश मंत्री, प्रकाश मकासरे यांसह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# भोसरीच्या तलावातील जलसृष्टी संवर्धनासाठी पुढाकार!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहाच्या मागे असलेल्या एसीटीपी (STP) प्रकल्पातून प्रक्रिया केलेले पाणी भोसरी सहल केंद्र परिसरातील तलावात सोडले जाते. या पाण्यामुळे तलावातील मासे मृत पावत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे केली होती.**



या पार्श्वभूमीवर भाजपाच्या नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच, प्रशासनाला पाणी तपासणीचे निर्देश दिले आहेत.

यावेळी पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यकारी अभियंता सोहम निकम, उपअभियंता प्रिती गाडे, कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले उपस्थित होते. नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत संबंधित विभागाला तलावातील पाण्याची तातडीने तपासणी (Water Testing) करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच तलावाच्या पर्यावरणीय स्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. दरम्यान, कोणत्याही प्रकारचे शिळे अन्न अथवा खराब अन्न पदार्थ तलावातील माशांना देऊ नयेत, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत. यामुळे पाण्याचे प्रदूषण वाढू नये आणि जलचर जीवांचे संरक्षण व्हावे, असा उद्देश व्यक्त करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणावर स्थानिक पातळीवर जनजागृती वाढत असून, नागरिकांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रशासनाने अधिक कठोर उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली आहे.

या विषयावर भाजपा नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे यांनीही लक्ष केंद्रित करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. परिसरातील पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी आणि तलावातील जैवविविधता सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यावर भर दिला जात आहे.

> भोसरीतील सहल केंद्रातील तलावात काही मासे मृत पावत असल्याच्या तक्रारींनंतर नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पाणी तपासणीचे निर्देश देण्यात आले असून परिस्थितीवर प्रशासनाचे लक्ष आहे. नागरिकांनी चिंता करू नये. तलावातील पाण्याची सखोल तपासणी सुरू करण्यात आली आहे. अहवाल आल्यानंतर आवश्यक ती तातडीची कार्यवाही केली जाईल. परिसरातील पर्यावरण व जलचरांचे संरक्षण हे आमचे प्राधान्य आहे.प्रशासनाकडून तलाव परिसरात निरीक्षण वाढविण्यात आले असून कोणतेही शिळे अन्न माशांना देऊ नये, अशा सूचना पुन्हा देण्यात आल्या आहेत.
>
> **- प्रा. सोनाली गव्हाणे, नगरसेविका, भाजपा, पिं.चिं.मनपा.**

# तणावातून यशाकडे संकल्पशक्तीचा प्रवास

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत अत्रे रंगमंदिर येथे "From Stress to Success – Manifestation Through Yoga & Meditation" या संकल्पनेवर आधारित विशेष योग व ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विद्याशरणम् प्राणिक स्टुडिओ आयोजित हा उपक्रम १६ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी खुला असून, सुमारे ५०० नागरिक सामूहिक ध्यान साधनेत सहभागी होणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक श्रीमती लीना खणके या तणाव व्यवस्थापन, सकारात्मक ऊर्जा, ध्यान साधना आणि मॅनिफेस्टेशनद्वारे यशाकडे वाटचाल याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात मानसिक स्थैर्य आणि संतुलन मिळविण्यासाठी योग व ध्यानाचे महत्त्व या कार्यक्रमातून अधोरेखित केले जाणार आहे. संस्थापक साक्षी जैन यांनी नागरिकांनी या प्रेरणादायी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. सामूहिक ध्यान, मार्गदर्शित मेडिटेशन आणि व्यवहारिक तणाव व्यवस्थापन तंत्रांचा समावेश असलेले हे सत्र सहभागींसाठी सकारात्मक जीवनदृष्टी विकसित करण्याची संधी ठरणार आहे.

> योग आणि ध्यान ही केवळ आरोग्याची साधने नसून मनाला स्थैर्य, शांतता आणि सकारात्मकता देणारी जीवनशैली आहे. धावपळीच्या जीवनात ती आपल्याला स्वतःशी जोडून विचारांना स्पष्टता आणि निर्णयक्षमतेला बळ देतात. शांत आणि संतुलित मनामुळे नातेसंबंध अधिक दृढ होतात तसेच कामातही अधिक यश मिळते. म्हणूनच दररोज काही क्षण योग, ध्यान आणि स्वतःसाठी राखणे हे आनंदी व समाधानकारक जीवनाचे खरे रहस्य आहे.
>
> **- साक्षी जैन, संस्थापक.**

Knowledge is Power

# Dr. D. Y. Patil
## Varale Campus
*A World of Career Opportunities Awaits*

Dr. SUSHANT PATIL GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....

An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University

**POLYTECHNIC**
Diploma

**ENGINEERING**
B. Tech | B.E.

**MANAGEMENT**
MBA | MCA

**ARCHITECTURE**
B. Arch | M. Arch

**ADMISSIONS OPEN 2026-27**

**Contact Us**
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218

1 KM
From Talegaon Railway Station

www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com

